**महाराष्ट्र शासन**
**विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,अमरावती विभाग,अमरावती.**
**टोपेनगर,अमरावती**

दुरध्वनी क्र.०७२१-२५५३६०५ फॅक्स क्र.०७२१-२५५३६४२

Email Id : - dydamt@gmail.com

---

जा.क्र. प्राथ/क/---८६५६---/२०१८ दिनांक :- 13 JUL 2018
पंजिबध्द डाकेने पोच दाखल्यासह

प्रति,

अध्यक्ष/सचिव,
प्रियदर्शनी शिक्षण संस्था, आमणी, ता.महागांव, जि.यवतमाळ
द्वारा प्रियदर्शनी कॉन्व्हेंट स्कुल, आमणी, ता.महागांव, जि.यवतमाळ

विषय:- महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिता परवानगी देण्याबाबत...

संदर्भ :- शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचा शासन निर्णय क्रमांक- एसएफएस-१०१८/प्र.क्र.४२४/एसएम-२, दिनांक २३/०५/२०१८

संदर्भिय शासन निर्णयान्वये महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३- चा ०१) अंतर्गत प्रियदर्शनी शिक्षण संस्था, आमणी, ता.महागांव, जि.यवतमाळ संचलित प्रियदर्शनी कॉन्व्हेंट स्कुल, आमणी, ता.महागांव, जि.यवतमाळ ही नवीन शाळा (प्राथमिक ते उच्च माध्यमिक इ.१ ते १२ वी इंग्रजी माध्यम, सर्व शाखा सीबीएसई) या शाळेस सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून स्वयंअर्थसहाय्यित नविन शाळा स्थापन करणे /दर्जावाढ करण्यांस अटी व शर्ती.ची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी प्राप्त झाली आहे.

| अ. क्र. | जिल्हा | संस्थेचे नांव व पत्ता | प्रस्तावित शाळेचे नांव व ठिकाण | नवीन शाळा/ दर्जावाढ | मंडळ संलग्न | प्रकार | माध्यम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | यवतमाळ | प्रियदर्शनी शिक्षण संस्था, आमणी, ता.महागांव, जि.यवतमाळ | प्रियदर्शनी कॉन्व्हेंट स्कुल, आमणी, ता.महागांव, जि.यवतमाळ | नवीन शाळा/ दर्जा वाढ | सीबी एसई | प्राथमिक ते उच्च माध्यमिक इ. १ ली ते १२ वी सर्व शाखा | इंगजी |

**अटी व शर्ती:- २.२**

(१) सदर संस्थेने संस्थेच्या नावे असलेल्या किमान १ एकर जमिनीबाबतचा ७/१२ उतारा /खरेदी खत/ नोंदणकृत बक्षिसपत्र किंवा जमिन/जागा भाडेकरारावरील (लीज) असल्यास ३० वर्ष किंवा त्या पेक्षा जास्त कालावधीच्या नोंदणीकृत भाडेकरार तसेच कवहित निकाषाची व मुदतीची मुदत ठेव पावती विभागीय शिक्षण उपसंचालक, अमरावती यांच्या कडे ३ महिएयाच्या आत सादर करणे आवश्यक आहे.

(२) सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदींचा व या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यांत येणाऱ्या सर्व नियमांची/ तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

(३) संबंधीत शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यांस खालील प्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यांत येत आहे.

(अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास

शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्यांच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

(ब) व्यवस्थापनास सन २०१८-१९ करिता या शासन निर्णयाव्दारे पात्र ठरविण्यांत आले असल्याने शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करुन या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्यांच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

(क.) शासन निर्णय दि.२० जुन २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वकष धोरणानुसार सी.बी.एस.ई. मंडळाचे संलग्नतेकरीता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी प्रथमतः शाळेस मान्यता (Recognition) घेणे आवश्यक राहिल. शाळेने अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) /जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक)/शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांच्या कडुन मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नताना- नाहरकत प्रमाण पत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पुर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना-हरकत (N.O.C.) प्रमाणपत्र देईल.

(४) परवानगी देण्यांत आलेल्या नवीन शाळेस (i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, (ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

(५) संबंधित सक्षम अधिकाऱ्यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(६) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादीमध्ये भविष्यांत कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरु करण्यासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यांत येईल.

(७) **यु-डायस :-** या शासन निर्णयाव्दारे परवानगी देण्यांत आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळा बाबत जिल्हानिहाय (U-DISE (Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरतांना, **"स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा "** म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन यु-डायस क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित केले आहे. त्याचप्रमाणे संस्थेने सर्व संबंधितांच्या माहितीकरिता **"स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा"** असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशव्दारावर लावणे आवश्यक राहील.

(८) परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यीत शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

वरिल प्रमाणे संदर्भिय शासननिर्णयातील सर्व शर्ती व अटींचे पालन करुन त्यानुसार कार्यवाहि करणे बंधनकारक राहिल.

**(शरद खंडागळे)**
शिक्षण उपसंचालक
अमरावती विभाग, अमरावती

**प्रतिलिपी:-**

१. मा. आयुक्त, (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - १
२. मा. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नी रोड, मुंबई
३. मा. शिक्षण संचालक, प्राथमिक, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांना माहितीकरिता सादर.
४. मा. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांना माहितीकरिता सादर.
५. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद,यवतमाळ यांना माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित